ISSN: 2278-4632
Vol-10 Issue-5 No. 2 January–December 2020

# कोल्हापूर जिल्ह्यातील गूळ उद्योगाचा अभ्यास

**डॉ.नवनाथ केदारी बनसोडे,**
भूगोल विभाग
भोगावती महाविद्यालय, कुरुकली

**गोषवारा (Abstract):-**

कोल्हापूर जिल्ह्यातप्राचीन कालावधीपासून गुळाचे उत्पादन घेतले जाते. हे गुळाचे उत्पादन पारंपरिक पद्धतीने घेतले जात होते.येथील गुळाला हक्काची बाजारपेठ राजश्री शाहू महाराजांनी मिळवून दिली. पण सातत्याने घसरणारे गुळाचे दर, कामगारांची कमतरता,साखर उद्योगाचीस्पर्धा, क्लस्टरची ससेहोलपट,यामुळेच बहुतांशी गुऱ्हाळघरे बंद पडली आहेत. गूळ तयार करण्यासाठी येणारा खर्च आणि बाजारपेठेत गुळाला मिळणारी किंमत यामध्ये तफावत असल्यामुळे कोल्हापूर जिल्ह्यातील गुऱ्हाळघरे बंद पडत आहेत.जिल्ह्यात करवीर, हातकणंगले, राधानगरी ,शिरोळ, कागल, गडहिंग्लज, चंदगड, आजरा या तालुक्यात गुऱ्हाळघरे आहेत. करवीर, हातकणंगले, राधानगरी तालुक्यात गुऱ्हाळघरांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे.परंतु गूळउद्योगाच्या समस्येचा अभ्यास करून या उद्योगाला ऊर्जितावस्था आणण्यासाठी क्लस्टर योजना राबवून, क्लस्टर योजनेतून उत्पादकांना प्रशिक्षण देणे, सेंद्रिय गूळ निर्मिताला चालना, उपपदार्थ निर्मितीला संधी, कोल्ड स्टोरजची उभारणी, गूळ उत्पादनाला दर्जा प्राप्त करून देणे आणि निर्यात झोन उपलब्ध करुन दिल्यास निश्चितच कोल्हापूर गूळ सातासमुद्रापार पोहोचून एक उद्योग म्हणून अस्तित्वात येईल. म्हणूनच मी प्रस्तुत शोध निबंधासाठी **कोल्हापूर जिल्ह्यातील गुळ उद्योगाचा अभ्यास** हा विषय निवडलेला आहे.

---

**प्रस्तावना:**

कोल्हापूर जिल्ह्यात गुळाचे पारंपरिक पद्धतीने उत्पादन घेतले जात होते. गुळालाहक्काची बाजारपेठ मिळावी म्हणून राजर्षी शाहूमहाराजांनी गुजरातमधील व्यापाऱ्यांना आमंत्रण दिले. शाहूपुरीत जमिनी दिल्या,भांडवल, सोयी सुविधा दिल्यानंतर इथली गुळाची बाजारपेठ फुलली. बाजारपेठेजवळरेल्वेस्टेशन असल्याने कोल्हापूरचा गुळ, मुंबई, गुजरातच्या, सौराष्ट्र,कराचीच्या बाजारपेठेत जाऊ लागला. स्वातंत्र्यानंतर सहकार महर्षी तात्यासाहेबमोहिते यांच्या दृष्टिकोनातून ही बाजारपेठ मार्केट यार्डात स्थलांतर झाली.ती विस्तारली मात्र सातत्याने घसरणारे दर, कामगारांची कमतरता, साखर उद्योगाचीस्पर्धा, क्लस्टरची ससेहोलपट, यामुळे जीआय (जिओग्राफिकल इंडिकेशन) मिळूनही गूळ उद्योगाला झेप घेणेअशक्य बनले आहे.

**उद्दिष्टे:**

1. कोल्हापूर जिल्ह्यातील सद्यस्थितीतील गुळ उद्योगाचा अभ्यास करणे
2. कोल्हापूर जिल्ह्यातील गूळ उद्योगाच्या समस्येचा अभ्यास करणे
3. कोल्हापूर जिल्ह्यातील गूळ उद्योगाला उर्जित अवस्था आणण्यासाठी उपाय सुचवणे


Copyright © 2020 Authors

ISSN: 2278-4632
Vol-10 Issue-5 No. 2 January–December 2020

**अभ्यास क्षेत्र:**

कोल्हापूर जिल्हा महाराष्ट्राच्या दक्षिणेकडील शेवटचा जिल्हा असुन त्याच्या पश्चिम-नैर्ऋत्येला सिंधुदुर्ग जिल्हा, पश्चिम-वायव्येला रत्नागिरी जिल्हा, उत्तर-ईशान्येला सांगली जिल्हा तर दक्षिणेला कर्नाटकमधील बेळगाव जिल्हा आहे. कोल्हापूर जिल्ह्याचा अक्षवृत्तीय विस्तार $15^{0}$ 42' 30" ते $17^{0}$ 11' 25" उत्तर अक्षवृत्तआणिरेखावृत्तीय विस्तार $73^{0}$ 43' 10" ते $74^{0}$ 43' 45" पूर्व रेखावृत्त इतका आहे . कोल्हापूर जिल्ह्याचे क्षेत्रफळ ७७४६ चौरस किलोमीटर इतके असून तेराज्याच्या क्षेत्रफळाच्या २.५ टक्के आहे.कोल्हापूर जिल्ह्यामध्ये १२तालुके आहेत. २०११ च्या जनगणेनुसार कोल्हापूर जिल्ह्याची लोकसंख्या ३८,७६,००१इतकी आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त तापमान ३८अंश सेल्सियस वकमीत कमी तापमान १४ अंश सेल्सियस इतके आहे.कोल्हापूर जिल्ह्यामध्ये वार्षिक सरासरी पाऊस ११५सेंटिमीटर इतके पडते.



Fig. No. 2.1

**माहिती संकलन वअभ्यास पद्धती:-**


Copyright © 2020 Authors

कोल्हापूर जिल्ह्यातील गूळ उद्योगाचा अभ्यास करण्यासाठी मी प्राथमिक वदुय्यम माहितीचा वापर केलेला आहे. प्राथमिक माहिती गोळा करीत असतांनाप्रश्नावली व मुलाखत या दोन पद्धतीचा उपयोग केलेला आहे. दुय्यम माहितीवेगवेगळे न्यूज पेपर,पुस्तके , प्रकाशित साहित्य इत्यादीचा वापर केलेला आहे.मिळालेल्या माहितीचे अधारे योग्य प्रकारे तक्ते करून त्याचे विश्लेषण केलेलेआहे.

**माहितीचे विश्लेषण**

**१.कोल्हापूर जिल्ह्यातील सद्यस्थितीतील गूळ उद्योग:-**

१९९० मध्ये जिल्ह्यात सुमारे १५०० गुऱ्हाळघरे सुरू होती. मजुरांची कमतरता,गुळाला मिळणारा कमी दर यामुळे बहुतांशी गुऱ्हाळघरे बंद पडली आहेत. सध्या १५०गुऱ्हाळघरे सुरू आहेत.जिल्ह्यात करवीर, हातकणंगले, राधानगरी ,शिरोळ, कागल,गडहिंग्लज, चंदगड, आजरा या तालुक्यात गुऱ्हाळघरे आहेत. करवीर, हातकणंगले,राधानगरी तालुक्यात गुऱ्हाळघरांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे .गूळ तयार करण्यासाठी येणारा खर्च आणि बाजारपेठेत गुळाला मिळणारी किंमत यामध्येफारशी तफावत नसल्यामुळे गुऱ्हाळघरे बंद पडत आहेत.

Table 1

**कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीमध्ये मिळणाऱ्या गुळाचे दर (रुपयांमध्ये)**

| वर्ष | आवक रावे | क्विंटल | उलाढाल | किमान दर | कमाल दर | सरासरीदर |
|---|---|---|---|---|---|---|
| २००१ | १९,८५,११५ | ५,९५,५३५ | ७६,२४,०२,३७५ | ९०० | २००५ | १२५० |
| २००५ | २२,८५,६७४ | ६,८५,७०४ | १,२५,६३,८४,८७५ | १२५० | ५१०० | १६५० |
| २०१० | २८,५०,१३५ | ८,५५,०४३ | २,१५,६६,३५,४०० | १९०० | ६००१ | २५०० |
| २०१५ | २२,३२,७२० | ६,६९,८१६ | २,००,९४,४२,४३५ | २३०० | ४९०० | ३००० |
| २०१६ | १९,५९,४३३ | ५,८७,८३३ | २,१९,४५,०६,७०० | २८०० | ५८०० | ३९०० |
| २०१७ | २२,०५,७१५ | ६,६१,७१५ | २,२६,२६,९३,१५० | २९०० | ६००१ | ३३०० |
| २०१८नोव्हेंबरपर्यंत | ६,२८,२९५ | १,८८,४८९ | ६१,६३,२२,१०० | २५०० | ६००० | ३२०० |

संदर्भ: कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती

**२.कोल्हापूर जिल्ह्यातील गूळ उद्योगाच्या समस्या:**

कोल्हापूर जिल्ह्यातील गुळाला जगभर प्रसिद्धी आहे. परंतू कोल्हापूर जिल्हाबाजार समितीमध्ये कर्नाटक व आंध्रप्रदेश या राज्यातील उत्पादक गूळ विक्रीसयेत आहे. कर्नाटकामधील गुळाचा दर्जा चांगला नसला तरी तो कोल्हापुरी गूळम्हणून खपवला जातो. त्यामुळे कोल्हापूरातील गुळाला योग्य प्रकारे भाव मिळतनाही. त्याच बरोबर कोल्हापूर जिल्ह्यामध्ये गूळ उद्योगाचा विकासकरण्यासाठी गुळ

 Copyright © 2020 Authors

क्लस्टर योजना सरकारकडून मंजूर झालेले आहे.परंतू त्याचीअंमलबजावणी होत नाही . सतत खंडीत होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे गुऱ्हाळ मालक अडचणीत आले आहेत. मुळातच मनुष्यबळाची कमतरता असताना सतत खंडीत होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे त्या मजुरांना बसून रहावे लागत आहे. डिझेलच्या वाढत्या किंमतीमुळे डिझेलवर गुऱ्हाळघर चालवणेही शक्य होत नाही.

**३.कोल्हापूर जिल्ह्यातील गूळ उद्योगाला उर्जित अवस्था आणण्यासाठी उपाय:-**

गूळ उद्योगाला उर्जित अवस्था आणण्यासाठी खालील उपाय महत्त्वाचे आहेत.

१.सेंद्रिय गूळ उत्पादनाकडे कल वाढवणे

२.क्लस्टर योजनेमधून उत्पादकांना प्रशिक्षण देऊन सेंद्रीय गुळाला चालना देणे

३.कोल्ड स्टोरेजची उभारणी करणे

४.उपपदार्थ निर्मितीला संधी देणे

५.गुळाला शासनामार्फत हमीभाव मिळावा

६.गुळाची किमान आधारभूत किंमत निश्चित करावी

७.शासनाने गूळ खरेदी करून अन्य व्यवसायांना पुरवने

८.गुळाला अनुदान द्यावे

९.गुळाचा दर्जा तपासण्यासाठी एक स्वतंत्र प्रयोगशाळा असावी

१०.कोल्हापुरी गुळाला जीआय (जिओग्राफिकल इंडिकेशन) मिळूनही त्याचा वापर योग्य प्रकारे होत नसल्यामुळे गुळाची बाजारपेठ फोफावत चालली आहे.

अशा प्रकारे वरील उपाययोजना केल्यास गूळ उद्योगाला उर्जित अवस्था येऊ शकते.

**निष्कर्ष:-**

कोल्हापूर जिल्ह्यातील गूळ उद्योगाला एक प्रदीर्घ इतिहास आहे. हा इतिहासटिकवून ठेवण्यासाठीक्लस्टर योजना राबवून,क्लस्टर योजनेतून उत्पादकांना प्रशिक्षण देणे, सेंद्रिय गूळ निर्मिताला चालना, उपपदार्थ निर्मितीला संधी, कोल्ड स्टोरजची उभारणी, गूळ उत्पादनाला दर्जा प्राप्त करून देणे आणि निर्यात झोन उपलब्ध करुन दिल्यास निश्चितच कोल्हापूर गूळ सातासमुद्रापार पोहोचून एक उद्योग म्हणून अस्तित्वात येईल.

**संदर्भ:-**

1. महाराष्ट्र टाइम्स,१६ डिसेंबर २०१८
2. कोल्हापूर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन
3. सेन्सस,२०११

 Copyright © 2020 Authors